भारत शिक्षण संस्था संचालित,

# श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय,

## उमरगा जि. उस्मानाबाद

(संलग्नित: डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद)

# राष्ट्रीय सेवा योजना

## नियमित उपक्रम अहवाल

२०१८-२०१९

# श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, उमरगा

# राष्ट्रीय सेवा योजना विभाग

## नियमित उपक्रम अहवाल - २०१८-१९

महाविद्यालयीन युवकांच्या मनात सामाजिक जाणीव निर्माण करणे, स्वावलंबन, सदाचार, समता, बंधुता, चारित्र्य संवर्धन, राष्ट्रीय एकात्मता या मूल्यांची रुजवण व्हावी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास साधला जावा या उदात्त हेतूने. म. गांधी व पंडित जवाहरलाल नेहरु, माजी शिक्षण मंत्री डॉ.व्ही.के.आर राव यांच्या प्रेरणा व दृष्ट्या नेतृत्वातून २४ सप्टेंबर १९६९ ला राष्ट्रीय सेवा योजनेची स्थापना झाली.

राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वंयसेवकांना जो बिल्ला दिला जातो त्यावर मध्यभागी चाक असून त्या चाकात आठ आरे आहेत. ते चोविस तासाचे प्रतिनिधीत्व करतात. चोविस तास राष्ट्रसेवेसाठी रासेयो स्वंयसेवक तत्पर त्या मधील लाल रंग हे युवकांच्या उसळत्या रक्तांचे प्रतीक आहे व निळा रंग आकाशाचे प्रतिनिधीत्व करतो. कार्य व कर्तृत्व आकाश मोकळे आहे असा त्यामागील अर्थ. कोणार्क येथील सूर्यमंदिराच्या रथाच्या चाकावर आधारित असलेले राष्ट्रीय सेवा योजनेचे हे चिन्ह गतीचे प्रतीक आहे. समाजामधिल विविध समस्या, प्रश्न सोडविणूकीसाठी स्वंयसेवकान्नी सेवा वृत्तीने कार्य केले तर समाजामध्ये परिवर्तन होऊ शकते.

रासेयोचे बोधवाक्य ‘नॉट मी बट यू’ माझ्यासाठी नाही तर तुमच्यासाठी ज्यामुले स्वातंत्र्य, समता, बंधूता, न्याय मानतावाद सेवावृत्ती या मूल्यांची रूजवन स्वंयसेवकामध्ये होते. राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबीरातून स्वंयसेवकामध्ये संवाद, संघटन, नेतृत्व, कौशल्य विकास,त्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास व्हावा या हेतूने प्रत्येक स्वंयसेवकाला विविध कार्याचे वाटप करून स्वत:ला घडण्याची संधी उपलब्ध करुन दिली जाते. शिबीराच्या माध्यमातून सांयकाळी विविध सामाजिक विषयावर पथनाट्य, एकांकिका नाटक, काव्यवाचन, कथा कथन आदि सांस्कृतिक कार्यक्रमातून ग्रामीण भागांतील नागरिकांचे उद् बोधन व मनोरंजन केले जाते. आजचे महाविद्यालयीन युवक उद्याचे आधारस्तंभ आहेत. या स्वंयसेवकामधूनच उद्याचे शास्त्रज्ञ,अभियंते, शिक्षणतज्ञ, पत्रकार, प्राध्यापक, डॉक्टर, वकील, विचारवंत, व्यावसायिक, राजकारणी, सामाजिक कार्यकर्ते, वक्ते, साहित्यिक सुजाण आदर्श नागरिक निर्माण होणार आहेत. म्हणूनच राष्ट्र विकासात राष्ट्रीय सेवा योजनेची भूमिका महत्त्वाची आहे.

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी फक्त वर्ग खोल्यांमध्येच शिक्षण न घेता समाजामध्ये जाऊन प्रत्यक्ष समाजमनाचा ठाव घेतला पाहिजे. समाजातील अनेकविध प्रश्नांना समजून घ्यावे, महाविद्यालयीन युवकांच्या मनात सामाजिक जाणीव निर्माण व्हावी, स्वावलंबन, सदाचार, समता, बंधुता, चारित्र्यवर्धन, राष्ट्रीय एकात्मता या मूल्यांची रुजवण व्हावी व यासोबतच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास साधला जावा या उदात्त हेतूने श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाने २०१८-१९ या शैक्षणिक वर्षात विविध उपक्रम राबवले. त्यामध्ये उल्लेखनीय म्हणजे वृक्षारोपण, आपत्ती व्यवस्थापन, व्यसनमुक्ती, रक्तगट तपासणी, पशुचिकित्सा,

स्त्रीभूणहत्या अभियान, साक्षरता अभियान, मतदार जागृती, प्रौढसाक्षरता अभियान, लोकसंख्या शिक्षण, एड्स जनजागृती यात्रा, पल्स पोलिओ मोहीम, व्यसनमुक्ती संदर्भात जनजागृती/ पथनाट्ये, आरोग्य शिबिरे, महिला सक्षमीकरण/ स्वावलंबन/ स्वसंरक्षण मेळावे, व्यक्तिमत्व विकास शिबीर, थोर पुरुषांचे स्मृतिदिन/जयंती/ पुण्यतिथी ईत्यादि उपक्रमांतून समाजामध्ये जाणीव जागृती करण्याचे कार्य रासेयोच्या स्वयंसेवकांनी केले. या सर्व कृती कार्यक्रमांचा विस्तृत अहवाल पुढे सादर करीत आहे.

## वनमहोत्सव वृक्षारोपणाने साजरा (१ ते ७ जुलै २०१८)

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने महाराष्ट्र सरकारच्या १३ कोटी वृक्ष लागवड व वनमहोत्सव सप्ताह (१ते ७ जुलै २०१८) निमित्ते महाविद्यालयीन परिसरात तण निर्मूलन व वृक्षारोपण करण्यात आले.

अमाप व अनियंत्रित वृक्षतोडीमुळे पर्यावरणाचे संतूलन बिघडत असुन त्याचे परिणाम आपण सर्व आता भोगत आहोत. त्यामुळे सर्व जगामध्ये पर्यावरण विषयक जनजागृती केल्या जात आहे. वृक्षारोपण, वृक्ष संवर्धन आणि जतन करणे हि काळाची गरज झाली आहे. वृक्षसंवर्धानाशिवाय मानवाला पर्याय नाही असे मत यावेळी भारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री अमोल मोरे यांनी व्यक्त केले. वृक्षरोपणासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी खड्डे खोदून श्रमदान केले. यावेळी एकूण ५२ वृक्षांचे रोपण करून त्यांचे जतन करण्याची जबाबदारी स्वयंसेवकांनी घेतली.

श्री छत्रपती शिवाजी महविद्यालय माजी विद्यार्थी संघटनेच्या वतीने झाडांना संरक्षक जाळी (ट्री गार्ड) **“वृक्ष दत्तक योजने”** अंतर्गत लावण्यात आले. भविष्यातही वृक्षसंवर्धनासाठी अशीच मदत करू असे आश्वासन माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष डॉ. सुभाष वाघमोडे यांनी दिले. या प्रसंगी भारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री अमोल मोरे, श्री जनार्धनराव साठे, श्री पद्माकरराव हराळकर, प्रा. सुरेश बिराजदार, डॉ. सुभाष वाघमोडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ जी एच जाधव, उपप्राचार्य डॉ. व्ही एस इंगळे (विज्ञान), डॉ एस एन अस्वले (वाणिज्य), प्रा डी व्ही थोरे (कला), प्रा बी एन गायकवाड (कनिष्ठ), एन एस एस कार्यक्रमाधिकारी डॉ व्ही डी देवरकर, प्रा आर एम सूर्यवंशी, डॉ एम एस निर्मळे , प्रा. डी. डी. पांढरे, प्रा. एस. डी. शिंदे, डॉ. डी. एस. चित्तमपले, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे ६० (मुले) व ९० (मुली) असे एकूण १५० स्वयंसेवक उपस्थित होते. त्यांनी एकूण १०५० मनुष्य तास काम केले.

## हरित सेना व रेड रिबन क्लब तर्फे वृक्षारोपण (२० जुलै २०१८)

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना व वनविभागाच्या सहकार्याने स्थापन केलेल्या हरित सेना महाराष्ट्र व रेड रिबन क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयीन परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

जागतिक तापमानवाढ, हवामान व ऋतू बदल याची दाहकता अणि तीव्रता कमी करण्यासाठी मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड हाती घेण्याचे कार्य महाराष्ट्र शासन अणि वन विभागाने हाती घेतले आहे. सर्व जगामध्ये पर्यावरण विषयक जनजागृती केल्या जात आहे. वनविभागाच्या सहाय्याने महाविद्यालयातील राष्ट्रिय सेवा योजनेचे स्वयंसेवक, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी हरितसेनेचे सदस्य  झाले असून त्यांच्या वतीने महाविद्यालयीन परिसरात कडुलिंब, चिंच, करंज, वड आदिचे वृक्षारोपण करण्यात आले. वृक्षरोपणासाठी राष्ट्रीय सेवा योजना व रेड रिबन क्लब च्या स्वयंसेवकांनी खड्डे खोदून श्रमदान केले. यावेळी एकूण  ५० वृक्षांचे रोपण करून त्यांचे जतन करण्याची जबाबदारी हरितसेना व रेड रिबन क्लब च्या स्वयंसेवकांनी घेतली.

या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी. एच. जाधव, उपप्राचार्य डॉ. एस. एन. अस्वले (वाणिज्य), प्रा. डी. व्ही. थोरे (कला), प्रा. व्ही. जे. तड़ोळगे  (कनिष्ठ ) एन एस एस कार्यक्रमाधिकारी डॉ. व्ही. डी. देवरकर, प्रा. आर. एम. सूर्यवंशी, डॉ. एम. एस. निर्मळे , प्रा. डी. डी. पांढरे, प्रा. एस. डी. शिंदे, प्रा.  एस.  व्ही. बहिरव, डॉ. पि. एस.  माने, प्रा.  एस. टी. दाड़गे, प्रा.  एस.  एस.  रेवते, प्रा. बी. ए.  शेळके, प्रा. आर. आर. नितनवरे, श्री. आर.  बी. सोनावणे, प्रा. आर.  एम.  खराडे, प्रा. एस. टी. तोड़कर, प्रा. डी.  बी. ढोबळे, प्रा. सी. डी. करे यांच्यासोबतच राष्ट्रीय सेवा योजना, हरितसेना, रेड रिबन क्लब चे स्वयंसेवक व शिक्षकेतर कर्मचारी अनिल तुंगे (नायक), फूलसुंदर माली, विनायक जाधव, रामराव जाधव, विलास इंगळे, तानाजी शिंदे, बालाजी शिंदे, बालाजी साठे, माधव मुगळे, शेख चाँद, शिरपा, प्रशांत वाडिकर, नरसिंग  जाधव बका कांबळे आदि उपस्थित होते.

यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे ५५ (मुले) व ६२ (मुली) असे एकूण ११७ स्वयंसेवक उपस्थित होते. त्यांनी एकूण २४१ मनुष्य तास काम केले.

## अण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक पुण्यतिथी  (१ ऑगस्ट २०१८)

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात राष्ट्रिय सेवा योजनेच्या स्वयंसेवकानी लोकमान्य टिळक पुण्यतिथी व  अण्णाभाऊ साठे जयंती उत्साहात साजरी केली. या निमित्ताने महाविद्यालयात व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. समाजकार्याचे बाळकडू राष्ट्रिय सेवा योजनेच्या कार्यक्रमातून मिळत असते . नवभारताच्या निर्मितीसाठी व सामाजिक न्यायासाठीच लोकमान्य टिळकांनी व अण्णाभाऊ साठे यांनी कार्य केले. विद्यार्थ्यांनी यांचा समाज प्रबोधनाचा वारसा मनमनात रुजवावा असे आवाहन डॉ. डी. बी. ढोबळे यांनी राष्ट्रिय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांना आपल्या व्याख्यानातून केले. विद्यार्थ्यांनी महापुरुषांची जयंती व पुण्यतिथि च्या निमित्ताने त्यांचे स्मरण करुन त्यांनी केलेल्या महान कार्याचे अनुकरण आपल्याही जीवनात केले पाहिजे असे मत डॉ. संजय अस्वले यांनी अध्यक्षीय भाषणात व्यक्त केले.

यावेळी महाविद्यालयाचे  उपप्राचार्य डॉ. संजय अस्वले कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी तर डॉ.  डी. बी. ढोबळे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. याप्रसंगी उपप्राचार्य प्रा. डी.  व्ही. थोरे, कार्यक्रमाधिकारी डॉ. व्ही. डी. देवरकर, प्रा. आर. एम. सूर्यवंशी, डॉ. एम. एस. निर्मळे, प्रा. डी. डी. पांढरे यांच्यासह श्रीमती डॉ. ए. एस. शिंदे, श्रीमती डॉ. आर. आर. नितनवरे, डॉ.  जी. एन. सोमवंशी, डॉ.  आर. एम. खराडे, डॉ. ए.  डी. देशमुख, डॉ.  एस. एस. रेवते, डॉ. व्ही. एस. सूर्यवंशी , डॉ.  ए. के. कटके, डॉ. डी. एस. इटले, डॉ. एस. डी. गावित, डॉ.  डी. एस.

चित्तमपल्ले, डॉ. एस. एम. सुरवसे, डॉ. डी. व्ही. बोंदर, डॉ. ए. एस. आष्टे, डॉ. सी. डी. करे, डॉ. पि. एस. माने, डॉ. ए. एम. गाडेकर आदि प्राध्यापक, तसेच राष्ट्रिय सेवा योजनेचे बहुसंख्य स्वयंसेवक उपस्थित होते.

या कार्यक्रमाची प्रस्तावना उपप्राचार्य प्रा. डी. व्ही. थोरे यांनी केली तर सूत्र संचालन डॉ. विनोद देवरकर यांनी केले. डॉ एम एस निर्मळे यांनी उपस्थितांचे आभार मानले. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे ८० (मुले) व ९० (मुली) असे एकूण १७० स्वयंसेवक उपस्थित होते. एकूण १७० मनुष्यतास त्यांनी ज्ञान/अनुभव घेतला.

## आंतरराष्ट्रीय आदीवासी दिवस व राष्ट्रीय जंत नाशक दिन साजरा (१० ऑगस्ट २०१८)

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात राष्ट्रिय सेवा योजनेच्या वतीने आंतरराष्ट्रीय आदिवासी दिवस व राष्ट्रिय जंत नाशक दिन साजरा करण्यात आला. यावेळी रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा आर एम सूर्यवंशी व प्रा एस डी शिंदे यांच्या नेतृत्वाखाली महाविद्यालयातील एस टी प्रवर्गातुन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे व त्यांना शिकवणाऱ्या डॉ. एस दि गावित व इतर प्राध्यापकांचे पुष्पवल्ली देऊन अभिनंदन करण्यात आले. यासोबतच प्राथमिकआरोग्य केंद्र , उमरगा व महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रिय जंत नाशक दिन साजरा केला. यावेळी महाविद्यालयाच्या दर्शनी भागात भित्तीपत्रक लाऊन, कृमींमुळे होणाऱ्या आजारांवर माहिती दिली.

याप्रसंगी कार्यक्रमाधिकारी प्रा आर एम सूर्यवंशी, प्रा एस डी शिंदे, प्रा पी डी पाटील, डॉ व्ही एस सूर्यवंशी, डॉ एस पी परसरकल्ले , डॉ डी बी ढोबळे, डॉ डी एस बिराजदार, प्रा एस आर चव्हाण, डॉ ए एम गाडेकर, डॉ ए डी देशमुख, डॉ डी एस इटले, डॉ एस एन मुच्छटे यांच्यासह राष्ट्रिय सेवा योजनेचे स्वयंसेवक उपस्थित होते.

यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे ५७ (मुले) व ७५ (मुली) असे एकूण १३२ स्वयंसेवक उपस्थित होते. एकूण १३२ मनुष्यतास त्यांनी ज्ञान/अनुभव घेतला.

## आपत्ती पूर्व प्रशिक्षण कार्यशाळा (११ ऑगस्ट २०१८)

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात राष्ट्रिय सेवा योजनेच्या वतीने स्वयंसेवक व कर्मचार्यांच्या सहकार्याने आपत्ती व्यवस्थापन कक्ष स्थापन करून एक दिवसीय आपत्ती पूर्व प्रशिक्षण कार्यशाळा दिनांक ११ ऑगस्ट २०१८ रोजी आयोजित करण्यात आली.

प्राथमिकआरोग्य केंद्र , उमरगा व नगर परिषद उमरगा यांच्या संयुक्त विद्यमाने आपत्ती पूर्व प्रशिक्षण हि कार्यशाळा आयोजित केली होती. यावेळी उमरगा - किल्लारी परिसर भूकंपप्रवण क्षेत्रात येत असल्यामुळे भूकंप झाल्यास कोणती काळजी घ्यावी याचे मार्गदर्शन उपप्राचार्य संजय अस्वले व भूगोल विभाग प्रमुख , प्रा. एस डी गावित, यांनी रासेयो च्या स्वयंसेवक व एन सी सी च्या कॅडेट्स यांना केले. यावेळी नगर परिषद आपत्ती व्यवस्थापन कक्ष कर्मचाऱ्यांनी महाविद्यालयातील रासेयो व एन सी सी च्या विद्यार्थ्यांना आपत्ती पूर्व प्रशिक्षण दिले.

याप्रसंगी कार्यक्रमाधिकारी डॉ विनोद देवरकर, प्रा आर एम सूर्यवंशी, प्रा एस डी शिंदे, प्रा पी डी पाटील, डॉ व्ही एस सूर्यवंशी, डॉ एस पी परसरकल्ले , डॉ डी बी ढोबळे, डॉ डी एस बिराजदार, प्रा एस आर चव्हाण, डॉ ए

एम गाडेकर, डॉ ए डी देशमुख, डॉ डी एस इटले, डॉ एस एन मुच्छटे यांच्यासह यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे ६० (मुले) व ६० (मुली) असे एकूण १२० स्वयंसेवक उपस्थित होते. त्यांनी एकूण २६० मनुष्य तास ज्ञान / अनुभव घेतला.

## .स्वच्छता पंधरवडा (१ ते १५ ऑगस्ट २०१८)

# कृती अहवाल

### दिनांक १ ऑगस्ट २०१८

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात राष्ट्रिय सेवा योजनेच्या वतीने, स्वच्छ भारत अभियान अंतर्गत 1 - 15 ऑगस्ट हा स्वच्छता पंधरवडा म्हणून साजरा करण्याच्या नियोजित कार्यक्रमांतर्गत स्वच्छता शपथ महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांनी ग्रहण केली.

यावेळी रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ विनोद देवरकर यांनी सर्वांना स्वच्छता शपथ दिली. "स्वच्छता ही आपल्याला ईश्वराच्या जवळ घेऊन जाते. आपल्यात नवनिर्मिति साठी नवचैतन्य निर्माण करते. स्वच्छतेमुळे आपली ओळख, पर्यायाने गावाची, देशाची प्रतिमा उंचावण्यासाठी मदत होते" असे मत प्राचार्य डॉ घनश्याम जाधव यांनी विद्यार्थ्यांना स्वच्छता संबोधना दरम्यान व्यक्त केले. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे १०२ (मुले) व १७० (मुली) असे एकूण २७२ स्वयंसेवक उपस्थित होते. त्यांनी एकूण २७२ मनुष्य तास वापरले.

### दिनांक २ ते ५ ऑगस्ट २०१८

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना, रेड रिबन क्लब व हरित सेनेच्या माध्यमातून परिसर स्वच्छता शिबिर यांच्या वतीने परिसरात दिनांक २ ते ५ ऑगस्ट दरम्यान सम्पन्न झाले. स्वच्छ भारत अभियान अंतर्गत स्वच्छता पंधरवडा कार्यक्रम अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना व हरितसेना विभागाच्या सहाय्याने महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसमवेत राष्ट्रिय सेवा योजनेचे स्वयंसेवक यांनी परिसर स्वच्छता कार्यशाळेत हिरीरिने भाग घेतला. यावेळी ‘मन स्वच्छ तर परिसर स्वच्छ’ हा मंत्र प्राचार्य डॉ घनश्याम जाधव यांनी विद्यार्थ्यांना दिला. परिसर स्वच्छतेमुळे रोगराई कमी होऊन आयुर्मान कैसे वाढते याचे मार्गदर्शन डॉ संजय अस्वले यांनी केले.

यावेळी महविद्यालयातील वर्गखोल्या, प्रयोगशाळा, सभागृह, मैदान, इत्यादी स्वच्छ करण्यात आले. यामध्ये एकूण २५० स्वयंसेवकांनी भाग नोंदविला. त्यांनी एकूण ५०० मनुष्य तास स्वच्छता कार्य केले.

### दिनांक ८ ऑगस्ट २०१८

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात राष्ट्रिय सेवा योजनेच्या वतीने महाविद्यालाच्या आजूबाजूला असलेल्या तसेच दत्तक घेतलेल्या तलमोड या गावी घरोघरी फिरून स्वच्छतेचे महत्व समजून सांगण्यात आले. यावेळी स्वयंसेवकांनी पदयात्रा काढून गावकर्यांना स्वच्छतेचा संदेश दिला.

यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे २५ (मुले) व ४० (मुली) असे एकूण ६५ स्वयंसेवक उपस्थित होते. त्यांनी एकूण २६० मनुष्य तास काम केले.

## दिनांक ९ ते १० ऑगस्ट २०१८

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात राष्ट्रिय सेवा योजनेच्या वतीने स्वच्छता पत्रके काढून स्वच्छतेची सवय रुजवण्यासाठी ग्रामपंचायतीच्या माध्यमातून पत्रके वाटण्यात आली. यावेळी स्वयंसेवकांनी पदयात्रा काढून गावकर्यांना स्वच्छतेचा संदेश पत्रकांच्या माध्यमातून दिला.

यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे ८० (मुले) व १४० (मुली) असे एकूण २२० स्वयंसेवक उपस्थित होते. त्यांनी एकूण ४४० मनुष्य तास काम केले.

## दिनांक ११ ते १३ ऑगस्ट २०१८

आंतरराष्ट्रीय युवा दिन हा महान तत्वज्ञानी स्वामी विवेकानंद यांचा जन्म दिवस. पूर्ण विश्वात हा दिवस युवा दिन म्हणून साजरा करण्यात येतो. युवकांना त्यांच्या आयुष्यात प्रेरणा मिळावी यासाठी महाविद्यालयामध्ये जयंती महोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी महाविद्यालयातील इंग्रजी विषयाचे प्राध्यापक डॉ. सी. डी. करे यांनी स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. त्या नंतर महादेव मंदिर उमरगा या सुप्रसिद्ध पौराणिक मंदिराच्या परिसराची स्वच्छता राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवक यांनी या दोन दिवसात केली.

यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे ६० (मुले) व ९० (मुली) असे एकूण १५० स्वयंसेवक उपस्थित होते. त्यांनी एकूण ३२५ मनुष्य तास काम केले.

## दिनांक १४ ते १५ ऑगस्ट २०१८

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना, रेड रिबन क्लब व हरित सेनेच्या वतीने परिसरात दिनांक १४ ते १५ ऑगस्ट ला स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी, प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी परिसरात आधीच वृक्षारोपण कार्यक्रमात लावलेली झाडे " एक स्वयंसेवक, एक वृक्ष संवर्धन" या कार्यक्रमांतर्गत प्रत्येकी एक झाड दत्तक घेऊन त्याच्या संगोपनाची व संवर्धनाची जबाबदारी स्वीकारली.

यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे २० (मुले) व ३० (मुली) असे एकूण ५० स्वयंसेवक उपस्थित होते. त्यांनी एकूण ५० मनुष्य तास कार्य केले.

## एक स्वयंसेवक एक वृक्ष संवर्धन कार्यक्रम (१५ ऑगस्ट २०१८)

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना, हरित सेना महाराष्ट्र व रेड रिबन क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयीन परिसरात लावलेल्या झाडांचे संगोपन व संवर्धन कृती कार्यक्रम स्वातंत्र दिनानिमित्ते राबवण्यात आला.

जागतिक तापमानवाढ अणि त्याची तीव्रता कमी करण्यासाठी मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड हाती घेण्याचे कार्य महाराष्ट्र शासन अणि वन विभागाने हाती घेतले आहे. सर्व जगामध्ये पर्यावरण विषयक जनजागृती केल्या जात आहे. वनविभागाच्या सहाय्याने महाविद्यालयातील राष्ट्रिय सेवा योजनेचे स्वयंसेवक, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी हरितसेनेचे सदस्य झाले असून त्यांच्या वतीने महाविद्यालयीन परिसरात कडुलिंब, चिंच, करंज, वड आदिचे वृक्षारोपण करण्यात आले. त्यांचे संगोपन व संवर्धन करण्याची जबाबदारी हरितसेना व रेड रिबन क्लब च्या स्वयंसेवकांनी घेतली.

या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी. एच. जाधव, उपप्राचार्य डॉ. एस. एन. अस्वले (वाणिज्य), प्रा. डी. व्ही. थोरे (कला), प्रा. व्ही. जे. तड़ोळगे (कनिष्ठ ) एन एस एस कार्यक्रमाधिकारी डॉ. व्ही. डी. देवरकर, प्रा. आर. एम. सूर्यवंशी, डॉ. एम. एस. निर्मळे , प्रा. डी. डी. पांढरे, प्रा. एस. डी. शिंदे, यांच्यासोबतच राष्ट्रीय सेवा योजना, हरितसेना, रेड रिबन क्लब चे स्वयंसेवक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे १०० (मुले) व १२३ (मुली) असे एकूण २२३ स्वयंसेवक उपस्थित होते. त्यांनी एकूण ४४६ मनुष्य तास ज्ञान / अनुभव घेतला.

## विद्यापीठ वर्धापन दिन साजरा (२३ ऑगस्ट २०१८)

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात २३ ऑगस्ट हा वर्धापन दिन म्हणून साजरा करण्यात आला. शिक्षण हे समाज विकासाचे माध्यम आहे.एक्ळाद्या परिसराचा विकास हा त्या परिसरात उपलब्ध असलेल्या शिक्षणावर अवलंबून असतो. विद्यापीठे, महाविद्यालये हि सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक विकास साधण्याचे माध्यमे आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने जरी शिक्षणाची द्वारे सर्वसामान्यांसाठी उघडी केली असली तरी, गुणवत्तेच्या मुल्यांकनात आपला देश प्रगत रस्त्रांच्या तुलनेत पिछाडीवर असल्याचा दिसतो. असे मत डॉ. बाबसाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उपकेंद्राचे माजी संचालक डॉ. रमेश दापके यांनी विद्यापीठ वर्धापन दिनाच्या औचित्याने आयोजित व्याख्यानादरम्यान व्यक्त केले.

डॉ. बाबसाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ वर्धापन दिनाच्या दिनाच्या निमित्ताने श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात डॉ. रमेश दापके यांचे "मराठवाड्यातील शिक्षण आणि वास्तव" याविषयावर व्याख्यान आयोजित केले होते. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. घनश्याम जाधव अध्यक्ष स्थानी होते. उपप्राचार्य डॉ. एस. एन. अस्वले (वाणिज्य), प्रा. डी. व्ही. थोरे (कला), प्रा. व्ही. जे. तड़ोळगे (कनिष्ठ ) एन एस एस कार्यक्रमाधिकारी डॉ. व्ही. डी. देवरकर, प्रा. आर. एम. सूर्यवंशी, डॉ. एम. एस. निर्मळे , प्रा. डी. डी. पांढरे, प्रा. एस. डी. शिंदे, यांच्यासोबतच राष्ट्रीय सेवा योजना, हरितसेना, रेड रिबन क्लब चे स्वयंसेवक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे ८२ (मुले) व २०० (मुली) असे एकूण २८२ स्वयंसेवक उपस्थित होते. त्यांनी एकूण ५६४ मनुष्य तास ज्ञान / अनुभव घेतला.

## कौशल्य विकास कार्यशाळा आयोजन (२३ ऑगस्ट २०१८)

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय व रोटरी क्लब उमरगा च्या संयुक्त विद्यमाने एक दिवसीय कौशल्य विकास कार्यशाळेचे दिनांक २३ ऑगस्ट ला आयोजन केले होते.

रोटरी ही अंतर्राष्ट्रीय संघटना असून नैसर्गिक आपदा, स्वच्छता अणि पाणी, पर्यावरण, रोग निर्मूलन, साक्षरता इत्यादि क्षेत्रांमधे अविरत कार्य करात आहे. जगभरातील सर्व रोटेरियन यासाठी तन, मन व धनाने कोणत्याही मोबदल्याशिवाय कार्य करत आहेत. यामधे त्याना मदत होते ती रोट्रेक्ट क्लब ची. हे रोट्रक्टेर्स तळमळीने समाजकार्य करतात असे मत यावेळी रोटरी क्लब उमरगाचे अध्यक्ष संतराम मूरजानी यांनी व्यक्त केले. राष्ट्रिय सेवा योजना व रोटरी क्लब एकत्र आल्यास फार मोठा बदल घडवून आणु शकतात असे मत यावेळी सचिव डॉ धनंजय मेनकुदळे यांनी मांडले.

पर्यावरण संवर्धन, व्यक्तिमत्व व कौशल्य विकास व समाजसेवा या क्षेत्रात विद्यार्थ्यांनी रोटरेक्ट क्लब च्या माध्यमातून राष्ट्रिय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी कार्य करावे असे आवाहन डिस्ट्रिक्ट लिटरसी डायरेक्टर डॉ संजय अस्वले यांनी केले. यावेळी रोटे व उपप्राचार्य धनाजी थोरे , रोटे सतीश गावित उपस्थित होते. कार्यक्रमाधिकारी रोटे विनोद देवरकर यांनी आभार व्यक्त केले.

यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे ८० (मुले) व १२५ (मुली) असे एकूण २०५ स्वयंसेवक उपस्थित होते. त्यांनी एकूण ६१५ मनुष्य तास ज्ञान / अनुभव घेतला.

## निसर्गपूरक राख्यांनी "वृक्षरक्षा बंधन" साजरे (२७ ऑगस्ट २०१८)

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात राष्ट्रिय सेवा योजना व वाणिज्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसीय "निसर्गपूरक राखी निर्मिती" कार्यशाळा व "वृक्षरक्षा बंधन" हा उपक्रम दिनांक २७/०८/२०१८ रोजी राबवण्यात आला.

'पर्यवरणाची अपरिमित हानी माणसाने आधीच केलेली आहे. आता त्याचे परिणाम आपण भोगत आहोत. त्यामुळे वृक्षारोपण, संगोपन अणि जतनही आपणच केले पाहिजे. आपल्या जीवनात शक्य तितक्या नैसर्गिक, निसर्गपूरक अणि विघटनशील पदार्थांचाच वापर केला पाहिजे' असे मत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. घनश्याम जाधव यांनी अध्यक्षीय भाषणात व्यक्त केले.

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा, त्यांच्यात व्यावसायिक नेतृत्व तयार व्हावे म्हणून निसर्गपूरक राखी निर्मिती कार्यशाळेचे आयोजन केलेले होते. स्वयंसेवक, विद्यार्थ्यांनी निसर्गपूरक राखी निर्मिती कार्यशाळेमधे उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. विद्यार्थ्यांनी स्वतः प्रात्यक्षिक करुन राख्या तयार केल्या. विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे म्हणून वाणिज्य विभागाच्या वतीने उत्कृष्ट निसर्गपूरक राखी स्पर्धा आयोजित केल्या गेली. या राख्यांच्या स्पर्धेमधे कु. चांदणी शिंदे (प्रथम), कु. रोहिणी चौगुले (द्वितीय), कु . भाग्यश्री साळुंखे व कु. पुजा नल्ला (तृतीय) यांनी पारितोषिक मिळवले. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून उपप्राचार्य डी. व्ही.थोरे व डॉ. अजित आष्टे यांनी काम पहिले.

पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी झाडे जगविणे व त्यांचे जनावरापासून संरक्षण करणे क्रमप्राप्त झाले आहे. निसर्ग पदोपदी आयुष्यभर आपल्या सोबत असतो. त्याचे ऋण फेडण्यासाठी "वृक्षवल्ली आम्हा सोयरे" या उक्ति नुसार वृक्षांनाच "भाऊ" मानून कार्यशाळेमधे तयार केलेल्या निसर्गपूरक राख्या महाविद्यालय परिसारतल्या वृक्षांना बांधून त्यांच्या संरक्षणाची जबाबदारी स्वयंसेविकांनी स्वीकारली.

यावेळी प्राचार्य डॉ घनश्याम जाधव, उपप्राचार्य डॉ. विलास इंगळे, उपप्राचार्य डॉ. संजय अस्वले, उपप्राचार्य धनाजी थोरे, डॉ. अजित आष्टे, यांच्यासोबतच राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. विनोद देवरकर,. प्रा. राजेंद्र सूर्यवंशी, डॉ. एम. एस. निर्मळे, प्रा. डी. डी. पांढरे प्रा. एस डी शिंदे व स्वयंसेवक बहुसंखेने उपस्थित होते. कार्यक्रमाची प्रस्तावना डॉ विनोद देवरकर यांनी केली. सूत्रसंचलन अमर सूर्यवंशी यांनी केले व डॉ अजित आष्टे यांनी आभार मानले.

यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे ७० (मुले) व १०२ (मुली) असे एकूण १७२ स्वयंसेवक उपस्थित होते. त्यांनी एकूण ५१६ मनुष्य तास ज्ञान / अनुभव घेतला.

## केरळ पूरग्रस्तांसाठी मदत फेरी (३० ऑगस्ट २०१८)

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी आज दिनांक ३०/०८/२०१८ रोजी केरळ राज्यातील पूरग्रस्तांसाठी मदत निधी पाठवण्यासाठी भव्य रेली चे आयोजन केले होते.यातून जमा झालेला निधी हा थेट केरळच्या मुख्यमंत्री राहत कोश मध्ये जमा केला जाणार आहे.

"नैसर्गिक आपदा ही कुठेही, कधीही येऊ शकते. अश्यावेळी मानवतेच्या दृष्टीकोनातून पीडितांना मदतीचा हात आपण दिला पाहिजे. त्यांच्या दुःखात आपण सहभागी होऊ शकत नाही पण त्यांच्या उध्वस्त झालेल्या कुटुंबाला उभारणी देण्यासाठी आपली अगदी छोटीशी मदतही खूप मोठे योगदान ठरणार आहे. म्हणून आपण सर्वांनी सढळ हाताने मदत करावी" असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. घनश्याम जाधव यांनी विद्यार्थ्यांना केले.

यावेळी उपप्राचार्य डॉ. विलास इंगळे, उपप्राचार्य डॉ. संजय अस्वले, उपप्राचार्य बी. एन. गायकवाड, पर्यवेक्षक व्ही. जी तडोळगे, श्रीमती डॉ. एम. एस. निर्मळे, श्रीमती डॉ. ए. एस. शिंदे, डॉ विनोद देवरकर, प्रा. राजेंद्र सूर्यवंशी, प्रा. व्हनाळे, श्री अमर सूर्यवंशी, श्री महादू शानमे, प्रा. व्हनाळे आदींनी निधी पेटीमध्ये मदत टाकून रेलीची सुरवात केली. यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी जमेल तेवढे पैसे निधी साठी दिलेत.

'मदतीचा हात, केरळला साथ', सेल्फी नको, मदत द्या', 'मदत करा, मदत करा.. पूरग्रस्तांना मदत करा' या रासेयो स्वयंसेवकांनी केलेल्या आवाहनाने आसमंत दुमदुमला. मदतनिधी रॅली च्या आयोजनासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. विनोद देवरकर, प्रा. राजेंद्र सूर्यवंशी, डॉ. एम. एस. निर्मळे, प्रा. सुजित शिंदे, प्रा. डी डी पांढरे यांनी परिश्रम घेतले.

यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे ८५ (मुले) व १७० (मुली) असे एकूण २५५ स्वयंसेवक उपस्थित होते. त्यांनी एकूण ५१० मनुष्य तास ज्ञान / अनुभव घेतला.

# स्वच्छ सर्वेक्षण ग्रामिण-२०१८

भारत सरकारच्या स्वच्छ भारत मिशन अंतर्गत, ग्रामिण स्वच्छता डिजिटल सर्वेक्षण स्वच्छ सर्वेक्षण ग्रामिण -१८(एस एस जी १८) या एंड्रॉइड एप च्या माध्यमातून ऑनलाइन सर्वेक्षण देशभरात करत आहे. "महाविद्यालयात शिकत असलेला विद्यार्थी हा त्याच्या गावाचे प्रतिनिधित्व करत असून तो समजदार, सुशिक्षित आहे. त्याचे मत तो कोणत्याही दबावाला बळी न पडता मोबाइल च्या माध्यमातून स्वतंत्रपणे नोंदवू शकतो असे मत यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी एच जाधव यांनी व्यक्त केले. क्षेत्र सर्वेक्षण कार्यशाळेच्या उदघाट्न प्रसंगी ते बोलत होते.

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय व जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ३१/०८/२०१८ रोजी आयोजित स्वच्छ सर्वेक्षण ग्रामिण -१८ (SSG-18) क्षेत्र कार्यशाळेस राष्ट्रिय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. यावेळी जिल्हा परिषदेच्या वतीते श्री ऋषिकेश डुमने यांनी SSG-18 ऐप कसे वापरायचे व सर्वेक्षणात आपला सहभाग कैसा नोंदवायचा याचे प्रशिक्षण महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना दिले व त्यांच्याकडून सर्वेक्षण पूर्ण करुन घेतले. यावेळी जवळपास ३५० प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व रासेयो स्वयंसेवकांनी आपला सहभाग या सर्वेक्षणात नोंदवला.

या कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी कार्यक्रमाधिकारी डॉ विनोद देवरकर, प्रा राजेंद्र सूर्यवंशी, डॉ एम एस निर्मळे, प्रा डी डी पांढरे व स्वयंसेवकांनी अथक परिश्रम घेतले. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे ५० (मुले) व ८० (मुली) असे एकूण १३० स्वयंसेवक उपस्थित होते. त्यांनी एकूण २६० मनुष्य तास ज्ञान / अनुभव घेतला.

# शिक्षक दिन व स्वयंशासन दिन (५ सप्टेंबर २०१८)

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय येथे आयक्यूऐसी, राष्ट्रिय सेवा योजना व वाङ्मय मंडळाच्या संयुक्त विद्यमाने शिक्षक दिनाच्या निमित्ताने स्वयंशासन दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी "शिक्षकांचे कविसम्मेलन" हा अभिनव कार्यक्रम राबवला. या संमेलनात दहा प्राध्यापकांनी सहभाग नोंदवला. शिक्षक हा विद्यार्थ्यांच्या जीवनाचा शिल्पकार असतो. एरव्ही वर्षभर अभ्यासक्रमाच्या चाकोरित शिकवतांना स्वतःच्या कलगुणांचा विसर शिक्षकाला पडणे सहाजिक आहे. याच बाबींचा विचार करुन राष्ट्रिय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी शिक्षकांना व्यक्त होण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करुन दिले.

"शिक्षकांच्या कार्याचा गौरव करतच कवितेच्या माध्यमातून व्यक्त होतांनाच आम्हाला मार्गदर्शनही करावे" असे आवाहन श्री अमर सूर्यवंशी यांनी प्रास्ताविकात व्यक्त केले. “स्वयंशासन दिनाचे औचित्य साधून वाङ्मय मंडळाने हा उपक्रम राबवल्याबद्दल अभिनंदन करुन भविष्यात या ही पुढे जाऊन साहित्य निर्मिती करावी” असे मत उपप्राचार्य प्रा डी व्ही थोरे यांनी मांडले. संमेलनाध्यक्ष प्राचार्य घनश्याम जाधव यांनी आईची महती गाणारी कविता सदर करुन सम्मेलनाची सुरवात केली. डॉ चंद्रकांत पवार, डॉ अनिल गाडेकर, डॉ विनोद देवरकर, डॉ पद्माकर पिटले, डॉ एस टी तोडकर, प्रा दत्ता माने, प्रा पी एस बनसोडे, प्रा व्ही टी जगताप, प्रा अंकुश गायकवाड, आदींनी कविता सादर केल्या.

यावेळी महाविद्यालयाचे प्राध्यापक, रासेयो चे कार्यक्रमाधिकारी डॉ विनोद देवरकर, प्रा राजेंद्र सूर्यवंशी, प्रा डी डी पांढरे, प्रा एस डी शिंदे, डॉ एम एस निर्मळे यांच्यासोबतच स्वयंसेवक बहुसंख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्र संचलन कु प्रतिक्षा पाटिल व श्री अमर सूर्यवंशी यांनी केले व श्री अनिल पवार यांनी काव्यमय आभार व्यक्त केले. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे ७६ (मुले) व १२३ (मुली) असे एकूण १९९ स्वयंसेवक उपस्थित होते. त्यांनी एकुण ३२२ मनुष्य तास ज्ञान / अनुभव घेतला.

## रोटरी युथ लीडरशिप अवार्ड (रायला, १२ सप्टेंबर २०१८)

यशप्राप्ती साठी आजकाल पालक आणि पाल्य दोघेही सजग झालेले दिसतात. परंतु नेमके यश कसे मिळवावे याचा मार्ग सापडत नसल्याने त्यांना अपेक्षित यशापासून दूर रहावे लागते. रोटरी क्लब उमरगा च्या माध्यमातून आयोजित 'रायला' या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या मनातील हा संभ्रम दूर केल्या जाऊ शकतो. त्यांना योग्य मार्गदर्शन या कार्यशाळेतून मिळते, असे मत यावेळी रोटे. संजय अस्वले यांनी व्यक्त केले.

रोटरी क्लब उमरगा च्या वतीने दिनांक १२/०९/२०१८ रोजी रोटरी युथ लीडरशिप अवार्ड (रायला) हा उपक्रम राबवण्यात आला. या उपक्रमाच्या माध्यमातून शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना "यश प्राप्ती कशी करावी" या बाबतीत सखोल मार्गदर्शन केले जाते अशी माहिती रोटरी क्लब चे अध्यक्ष रोटे. संतराम मुरजानी यांनी दिली. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून रोटरी लिटरसीचे जिल्हा संचालक रोटे. डॉ. संजय अस्वले यांनी विद्यार्थ्यांना करिअर कसे ठरवावे व त्यासाठी ध्येय निश्चय करावा व त्या ध्येय पुर्तीसाठी अवश्यक कौशल्य कोणती हे प्रात्यक्षिकासह मनोरंजनातून विद्यार्थ्यांना सहभागी करून स्पष्ट केले व जीवनात यश मिळवण्यासाठी अथक परिश्रम करणे आवश्यक आहे पण जर आपले ध्येय निश्चित नसेल तर आपले परिश्रम वाया जातात. म्हणूनच ध्येय निश्चितीला यशाची गुरुकिल्ली समजले पाहिजे असे मत त्यांनी मांडले.

दुसऱ्या सत्रात माजी प्रांतपाल डॉं दिपक पोफळे यानी नवनवीन बदलांचे स्वागत करावे,त्याना सामोरे जावे, प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करावा असे आवाहन करताना संभाषण कौशल्याचा मंत्र विद्यार्थ्याना दिला. यावेळी शरणाप्पा मलंग विद्यालयाचे व श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक बहुसंखेने उपस्थित होते. या कार्यशाळेचे आयोजनासाठी प्रकल्प संचालक रोटे. डॉ. विनोद देवरकर यांनी परिश्रम घेतले. कार्यशाळेच्या अध्यक्ष स्थानी रोटे. संतराम मुरजानी हे होते. प्रस्तावना रोटरी सचिव डॉ. धनंजय मेनकुदळे तर सूत्र संचलन रोटे. परमेश्वर सुतार, रोटे. प्रवीण स्वामी यांनी उपस्थितांचे आभार मानले.

यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे ७० (मुले) व ७२ (मुली) असे एकूण १४२ स्वयंसेवक उपस्थित होते. त्यांनी एकूण २८४ मनुष्य तास ज्ञान / अनुभव घेतला.

## राष्ट्रीय सेवा योजना वर्धापन दिन (२४ सप्टेंबर २०१८)

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात २४ सप्टेंबर हा राष्ट्रीय सेवा योजनेचा वर्धापन दिन म्हणून साजरा करण्यात आला. यावेळी प्राचार्य डॉ. घनश्याम जाधव यांच्या हस्ते रासेयो ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजना हा भारत सरकारची स्थायी योजना असून शाळा व महाविद्यालयातून गेली ५० वर्षांपासून राबवला जातो. जागतिक लोकसंख्या वाढ, नवनवीन आजारांचे थैमान या धर्तीवर स्वच्छतेचे अनन्यसाधारण महत्व आहे

असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. जी एच जाधव यांनी यावेळी केले. विद्यार्थ्यांमध्ये समाजसेवा, नेतृत्व गुण, सामाजिक भान रुजवावे हि त्या मागची मुख्य संकल्पना होय असे मत कार्यक्रमाधिकारी डॉ. विनोद देवरकर यांनी व्यक्त केले.

रासेयो वर्धापन दिनाच्या दिनाच्या निमित्ताने आयोजित ध्वजारोहानास उपप्राचार्य डॉ. एस. एन. अस्वले (वाणिज्य), प्रा. डी. व्ही. थोरे (कला), प्रा. व्ही. जे. तड़ोळगे (कनिष्ठ ) एन एस एस कार्यक्रमाधिकारी डॉ. व्ही. डी. देवरकर, प्रा. आर. एम. सूर्यवंशी, डॉ. एम. एस. निर्मळे , प्रा. डी. डी. पांढरे, प्रा. एस. डी. शिंदे, यांच्यासोबतच राष्ट्रीय सेवा योजना, हरितसेना, रेड रिबन क्लब चे स्वयंसेवक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे ९० (मुले) व १३० (मुली) असे एकूण २२० स्वयंसेवक उपस्थित होते. त्यांनी एकूण ४४० मनुष्य तास ज्ञान / अनुभव घेतला.

## सर्जिकल स्ट्राईक दिवस (२९ सप्टेंबर २०१८)

सीमेवर लढणारे जवान घर-दार सोडून महिनोन्महिने उन, पाऊस, थंडी वारा यांचा मारा सहन करत सिमेपल्याड असलेल्या शत्रूपासून संरक्षण देण्याचे काम करत असतात. देश्याच्या सीमेवर कर्तव्य बजावत असतांना देशभक्ती एवढाच विचार त्यांच्या डोक्यामध्ये असतो. मृत्यूशी झुंज देत अनेक सर्जिकल स्ट्राईक, रेड, कारवाया सीमा व देश संरक्षणासाठी कराव्या लागतात. ज्याची सर्वसामान्य जनतेला कल्पनाही नसते. त्यांचे कार्य व तयाप्रती आदर निर्माण व्हावा यासाठी विद्यमान सरकारने २९ सप्टेंबर हा दिवस "सर्जिकल स्ट्राईक दिवस" / शौर्य दिवस म्हणून साजरा करावा असे आवाहन केले. त्या निमित्ते आयोजित कार्यक्रमात कॅप्टन सुर्यकांत जाधव बोलत होते.

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दिनांक २९/०९/२०१८ रोजी "सर्जिकल स्ट्राईक दिवस" साजराकरण्यात आला.कार्यक्रमाच्या प्रस्तावनेत माजी सैनिक श्री खंडू दुधभाते म्हणाले "सैनिकाला लढायची उर्जा मिळते ती तुमच्या आदरभावातून. त्याच्या कार्याचा आदर करा, गौरव करा तो तुमच्यासाठी शत्रूशी लढेल''. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. घनश्याम जाधव यांनी त्यांच्या अभ्यास दौऱ्यादरम्यान आलेले त्यांचे अनुभव, तिथली कठीण परिस्थिती, सैनिकांना वाटत असलेली आपुलकी याचे कथन व त्याच्या कार्याचा गौरव अध्यक्षीय समारोपात केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. विनोद देवरकर यांनी केले तर डॉ. एम. एस. निर्मळे यांनी आभार मानले. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रा. राजेंद्र सूर्यवंशी, प्रा. सुजित शिंदे, प्रा. डी डी पांढरे व सर्व स्वयंसेवक उपस्थित होते. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे ९० (मुले) व १०० (मुली) असे एकूण १९० स्वयंसेवक उपस्थित होते. त्यांनी एकूण ३८० मनुष्य तास ज्ञान / अनुभव घेतला.

# स्वच्छ हि सेवा (दिनांक २४ सप्टेंबर ते ०२ ऑक्टोबर २०१८)

# कृती अहवाल

## दिनांक २४ सप्टेंबर २०१८ (रासेयो वर्धापन दिन व स्वच्छतेचे महत्व)

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात राष्ट्रिय सेवा योजनेच्या वतीने, स्वच्छ हि सेवा या कृती कार्यक्रमांतर्गत अंर्तगत दिनांक २४ सप्टेंबर ते २ ऑक्टोंबर २०१८ हा कालावधी स्वच्छता कालावधी म्हणून साजरा करण्याचा निर्धार राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी केला. य कृती कार्यक्रमाची सुरवात २४ सप्टेंबर पासून करण्यात आली.

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात २४ सप्टेंबर रोजी "राष्ट्रिय सेवा योजना वर्धापन दिन" ध्वजारोहण करुन साजरा करण्यात आला. बदलते वातावरण, जागतिक लोकसंख्या वाढ, नवनवीन आजारांचे थैमान या धर्तीवर भारत सरकार ने सुरु केलेल्या "स्वच्छ ही सेवा" उपक्रमला अनन्यसाधारण महत्व आहे. जगभरात आरोग्य व स्वछता याचे याचे सम गुणोत्तर बघायला मिळते. जिथे स्वच्छता असते तिथे आरोग्य नांदते, म्हणूच "स्वच्छ हो भारत" ही कामना कृतीतून प्रत्यक्षात आणूया असे प्रतिपादन प्राचार्य डॉ जी एच जाधव यांनी यावेळी केले.

राष्ट्रिय सेवा योजना हा भारत सरकारचा स्थायी उपक्रम असून महाविद्यालये, शाळा यातून तो राबवला जातो. विद्यार्थ्याला सामाजिक भान, समाजसेवा, नेतृत्व गुण यांचे बाळकडू विद्यार्थी जीवनातच मिळावे म्हणून हा उपक्रम महत्वाची भूमिका पार पाडतो. रासेयो चे देशभरातील लाखो स्वयंसेवक स्वच्छतेच्या सेवेमधे योगदान देतील असा विश्वास डॉ विनोद देवरकर यांनी व्यक्त केला.

या प्रसंगी महाविद्यालयातील प्राचार्य डॉ जी एच जाधव, उपप्राचार्य डॉ. विलास इंगळे, उपप्राचार्य डॉ. संजय अस्वले, उपप्राचार्य प्रा डी व्ही थोरे, उपप्राचार्य बी. एन. गायकवाड, पर्यवेक्षक व्ही. जी तडोळगे, सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, कार्यक्रमाधिकारी प्रा. राजेंद्र सूर्यवंशी, डॉ. एम. एस. निर्मळे, प्रा. सुजित शिंदे, प्रा. डी डी पांढरे यांच्यासह रासेयो स्वयंसेवक उपस्थित होते.

यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे ८५ (मुले) व १७५ (मुली) असे एकूण २७० स्वयंसेवक उपस्थित होते. एकूण २७० मनुष्यतास त्यांनी ज्ञान/अनुभव घेतला.

## दिनांक २५ ते २७ सप्टेंबर २०१८ (वृक्ष संवर्धन व प्लास्टिक मुक्त परिसर)

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना, रेड रिबन क्लब व हरित सेनेच्या माध्यमातून परिसर स्वच्छता, वृक्ष संवर्धन व प्लास्टिक मुक्त परिसर यावर कार्यशाळा दिनांक २५ ते २७ सप्टेंबर दरम्यान घेण्यात आली. स्वच्छ हि सेवा कार्यक्रम अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना व हरितसेना विभागाच्या सहाय्याने महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसमवेत राष्ट्रिय सेवा योजनेचे स्वयंसेवक यांनी परिसर स्वच्छता, वृक्ष संवर्धन व प्लास्टिक मुक्त परिसर कार्यशाळेत हिरीरिने भाग घेतला. यावेळी ‘वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे’ या ओवीची आठवण वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. विनोद देवरकर यांनी उपस्थित स्वयंसेवकांना करून दिली. परिसर स्वच्छतेमुळे रोगराई कमी होऊन आयुर्मान कैसे वाढते याचे मार्गदर्शन डॉ संजय अस्वले यांनी केले.

यावेळी महविद्यालयातील वर्गखोल्या, प्रयोगशाळा, सभागृह, मैदान, इत्यादी प्लास्टिक मुक्त करण्यात आले. परिसरातील सगळे प्लास्टिक गोळा करून ते जाळण्यात आले. या प्रसंगी महाविद्यालयातील प्राचार्य डॉ जी एच जाधव, उपप्राचार्य डॉ. विलास इंगळे, उपप्राचार्य डॉ. संजय अस्वले, उपप्राचार्य प्रा डी व्ही थोरे, उपप्राचार्य बी. एन. गायकवाड, पर्यवेक्षक व्ही. जी तडोळगे, सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, कार्यक्रमाधिकारी प्रा. राजेंद्र सूर्यवंशी, डॉ. एम. एस. निर्मळे, प्रा. सुजित शिंदे, प्रा. डी डी पांढरे यांच्यासह रासेयो स्वयंसेवक उपस्थित होते.यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे ३५ (मुले) व ८७ (मुली) असे एकूण १२२ स्वयंसेवक उपस्थित होते. एकूण २४४ मनुष्यतास त्यांनी ज्ञान/अनुभव घेतला.

## दिनांक २९ सप्टेंबर २०१८ (सर्जिकल स्ट्राईक दिवस)

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दिनांक २९/०९/२०१८ रोजी "सर्जिकल स्ट्राईक दिवस" साजरा करण्यात आला. यावेळी "जवानांना प्रेम-आदर द्या, ते तुमच्यासाठी प्राण देतील" असे प्रतिपादन कॅप्टन सुर्यकांत जाधव यांनी केले.

सीमेवर लढणारे जवान घर-दार सोडून महिनोन्महिने उन, पाऊस, थंडी वारा यांचा मारा सहन करत सिमेपल्याड असलेल्या शत्रूपासून संरक्षण देण्याचे काम करत असतात. देश्याच्या सीमेवर कर्तव्य बजावत असतांना देशभक्ती एवढाच विचार त्यांच्या डोक्यामध्ये असतो. मृत्यूशी झुंज देत अनेक सर्जिकल स्ट्राईक, रेड, कारवाया सीमा व देश संरक्षणासाठी कराव्या लागतात. ज्याची सर्वसामान्य जनतेला कल्पनाही नसते. त्यांचे कार्य व तयाप्रती आदर निर्माण व्हावा यासाठी विद्यमान सरकारने २९ सप्टेंबर हा दिवस "सर्जिकल स्ट्राईक दिवस" साजरा करावा असे आवाहन केले. त्या निमित्ते आयोजित कार्यक्रमात कॅप्टन सुर्यकांत जाधव बोलत होते.

कार्यक्रमाच्या प्रस्तावनेत माजी सैनिक श्री खंडू दुधभाते म्हणाले "सैनिकाला लढायची उर्जा मिळते ती तुमच्या आदरभावातून. त्याच्या कार्याचा आदर करा, गौरव करा तो तुमच्यासाठी शत्रूशी लढेल". कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. घनश्याम जाधव यांनी त्यांच्या अभ्यास दौऱ्यादरम्यान आलेले त्यांचे अनुभव, तिथली कठीण परिस्थिती, सैनिकांना वाटत असलेली आपुलकी याचे कथन व त्याच्या कार्याचा गौरव अध्यक्षीय समारोपात केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. विनोद देवरकर यांनी केले तर डॉ. एम. एस. निर्मळे यांनी आभार मानले.यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रा. राजेंद्र सूर्यवंशी, प्रा. सुजित शिंदे, प्रा. डी डी पांढरे व सर्व स्वयंसेवक उपस्थित होते. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे ९० (मुले) व १०० (मुली) असे एकूण १९० स्वयंसेवक उपस्थित होते. एकूण १९० मनुष्यतास त्यांनी ज्ञान/अनुभव घेतला.

## दिनांक ३० सप्टेंबर ते १ऑक्टोंबर २०१८ (स्वच्छता यात्रा व दारोदारी प्रचार)

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दिनांक ३०/९/२०१८ रोजी काळे प्लाट, उमरगा परीसरात स्वच्छता रैली काढून रस्ते, नाले, गटारींची स्वच्छता करून स्वच्छतेचे महत्व समजावून सांगीतले. यावेळी स्वयंसेवकांनी व कार्यक्रमाधीकारी यांनी परीसरात स्वच्छता ठेवण्याचे महत्व छापील पत्रिकांच्या माध्यमातून समजावून सांगण्यासाठी घरोघरी भेटी दिल्या.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य कार्यक्रमाधिकारी डॉ. विनोद देवरकर, डॉ. एम. एस. निर्मळे, प्रा. राजेंद्र सूर्यवंशी, प्रा. सुजित शिंदे व सर्व स्वयंसेवक उपस्थित होते. स्वच्छता यात्रेमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचे ४० (मुले) व ६० (मुली) असे एकूण १०० स्वयंसेवक उपस्थित होते.

### दिनांक ०२ ऑक्टोंबर २०१८ (महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती)

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दिनांक २/१०/२०१८ रोजी "राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती" मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ जी. एच. जाधव यांनी प्रतिमा पूजन केले व दोन्ही महापुरुषांच्या कार्यावर प्रकाश टाकला.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.घनश्याम जाधव, उपप्राचार्य डॉ. संजय अस्वले, उपप्राचार्य प्रा. धनाजी थोरे, कार्यक्रमाधिकारी डॉ. विनोद देवरकर, डॉ. एम. एस. निर्मळे, प्रा. राजेंद्र सूर्यवंशी, प्रा. सुजित शिंदे व सर्व स्वयंसेवक उपस्थित होते. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे २० (मुले) व ३० (मुली) असे एकूण ५० स्वयंसेवक उपस्थित होते. एकूण ५० मनुष्यतास त्यांनी ज्ञान/अनुभव घेतला.

## धम्मचक्र प्रवर्तन दिन (१४ ऑक्टोबर २०१८)

हस्ताक्षर हे मन व स्वभाव उलगडण्याचे तसेच व्यक्त होण्याचे सशक्त माध्यम असून तंत्रज्ञानाच्या या युगात ही कला लुप्त होण्याच्या मार्गावर आहे. सुंदर हस्ताक्षरात लिहलेली पत्रे आजही अनेकांनी आठवणींचा ठेवा म्हणून जतन केलेली आहेत. माहितीच्या आंतजालामुळे सहज उपलब्ध होणारे संदेश, जसेच्या तसे एकमेकांना पाठवले जातात त्यामुळे स्वलेखन कला संपुष्टात येते कि काय? हा प्रश्न अभ्यासकांना पडतो आहे. या पार्श्वभूमीवर हस्तलिखित भित्तीपत्रिका उपक्रमाचे अनन्यसाधारण महत्व आहे असे मत डॉ. जी. एच. जाधव यांनी अनावरण प्रसंगी व्यक्त केले.

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात आज दिनांक १४/१०/२०१८ रोजी राष्ट्रीय सेवा योजना व वाड.मय मंडळाच्या संयुक्त विद्यमाने वतीने धम्मचक्र प्रवर्तन दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांमध्ये वाचन व लिखाणाची आवड निर्माण व्हावी, त्यांना व्यक्त होण्यास व्यासपीठ मिळावे म्हणून “हस्तलिखित भित्तीपत्रक” या उपक्रमाची सुरवात करण्यात आली. वाड.मय मंडळाचे अध्यक्ष प्रा. एस. व्ही. बहिरव व सदस्य यांनी विद्यार्थी संपादकांना मार्गदर्शन करून स्वयंसेवक विद्यार्थ्यांना लिहिते केले. विद्यार्थी संपादक म्हणून श्री संतोष कांबळे, कु. संध्या पत्रोळे, कु. मेघा पुजारी, कु. पल्लवी गायकवाड व श्री मारुती होगाडे यांनी काम पहिले.

भित्तीपत्रक अनावरण प्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. व्ही. एस. इंगळे, उपप्राचार्य प्रा. डी. व्ही. थोरे, उपप्राचार्य बी. एन. गायकवाड, पर्यवेक्षक व्ही. जी. तडोळगे, मराठी विभागप्रमुख डॉ. पद्माकर पिटले, हिंदी विभागप्रमुख डॉ. आर. एम. खराडे, वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख तथा रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. विनोद देवरकर, प्राणीशास्त्र विभागप्रमुख डॉ. चंद्रकांत पवार, प्रा. जीवन जाधव, डॉ. सन्मुख मुच्छटे, आदि उपस्थित होते. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे ५० (मुले) व ११० (मुली) असे एकूण १६० स्वयंसेवक उपस्थित होते. त्यांनी एकूण १६० मनुष्य तास ज्ञान / अनुभव घेतला.

## जागतिक अंध दिन व वाचन प्रेरणा दिन (दि. १५ ऑक्टोबर२०१८)

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात आज १५/१०/२०१८ रोजी राष्ट्रीय सेवा योजना व वाङ्मय मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्ते "वाचन प्रेरणा दिनाचे" व जागतिक अंध दिनाचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. कलाम यांचा वाढदिवस हा वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा केला जावा अशी त्यांची इच्छा होती. ज्ञानाने मनुष्य समृद्ध व प्रगल्भ होतो. त्याकरिता प्राध्यापक, विद्यार्थी, व सर्व शिक्षित जनामध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी. समृद्ध ग्रंथालयातील पुस्तके वाचकांपर्यंत, विद्यार्थ्यांपर्यंत पोहचली पाहिजेत म्हणून हा वाचन प्रेरणा दिन साजरा केला गेला.

आपण कुठल्या जातीत जन्मलो त्यापेक्षा ज्ञानाच्या बळावर आपण कुठे पोहचलो हे महत्वाचे. वेगवेगळ्या जातीत जन्मूनही अनेक साहित्यिकांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून समाज परिवर्तन घडवून शेवटी पुस्तकांसोबतच या जगाचा निरोप घेतला असेही मत डॉ. पिटले यांनी व्यक्त केले.

ग्रंथालये ही वाचकांअभावी स्मशानवत झाली आहेत. त्यांच्या अंत्ययात्रेचे साक्षिदार होण्यापेक्षा त्याला आनंदयात्रेचे स्वरूप कसे आणता येईल यावर विचार झाला पाहिजे. ग्रंथालयातील पुस्तके धूळ खात न पडू देता वाचकांपर्यंत कशी पोहचवावीत जेणेकरून ग्रंथालये हि वाचनालयांमध्ये परावर्तीत होतील. यावर विचारमंथन होणे गरजेचे आहे असे प्रतिपादन प्रमुख वक्ते डॉ. पद्माकर पिटले यांनी "वाचन प्रेरणा दिनानिमित्ते" आयोजित व्याख्यानात केले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष उपप्राचार्य, प्रा. डी. व्ही. थोरे म्हणाले कि, सुजलाम सुफलाम संस्कृती असणाऱ्या आपल्या देशामध्ये वाचन प्रेरणा दिन साजरा करण्याची वेळ यावी ही बाब भावी पिढीसाठी चिंताजनक आहे. त्यामुळे आपण सर्वांनी एकविसाव्या शतकामध्ये पुस्तकांबरोबरच माणसंही वाचायला शिकली पाहिजेत. जेणेकरून येणाऱ्या पिढीसाठी आपण मजबूत पायाभरणी केली जाईल.

याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी. एच. जाधव, उपप्राचार्य डॉ. व्ही. एस. इंगळे, उपप्राचार्य बी. एन. गायकवाड, पर्यवेक्षक व्ही. जी. तडोळगे, हिंदी विभागप्रमुख डॉ. आर. एम. खराडे, वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख व रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. विनोद देवरकर, डॉ. एम. एस. निर्मळे, प्रा. राजेंद्र सूर्यवंशी, प्रा. सुजित शिंदे, प्रा. डी. डी. पांढरे, सर्व विभागांचे विभागप्रमुख व प्राध्यापक उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. विनोद देवरकर, सूत्र संचलन प्रा. एस. पी. पसरकल्ले, तर आभार डॉ. आर. एम. खराडे यांनी मानले.

यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे ७२ (मुले) व ११० (मुली) असे एकूण १८२ स्वयंसेवक उपस्थित होते. त्यांनी एकूण ३६४ मनुष्य तास ज्ञान / अनुभव घेतला.

## राष्ट्रीय एकता दिवस (दि. ३१ ऑक्टोबर २०१८)

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने ३१ ऑक्टोबर, हा दिवस सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंती निमित्ते "राष्ट्रीय एकता दिवस" म्हणून साजरा करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. घनश्याम जाधव, उपप्राचार्य डॉ. संजय अस्वले, उपप्राचार्य व्ही. एस. इंगळे, उपप्राचार्य

डी. व्ही. थोरे हे उपस्थित होते. राष्ट्रीय एकता दिनाचे औचित्य साधून एकता रॅली, व्याख्यान, निबंध स्पर्धा आयोजित कण्याचा मानस यावेळी रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. विनोद देवरकर यांनी प्रस्तावनेत व्यक्त केला.

भारत स्वतंत्र झाला तेंव्हा ५६२ प्रादेशिक संस्थाने अस्तित्वात होती. यापैकी अनेकांनी स्वेच्छेने स्वतंत्र भारतात विलीनीकरणास संमती दर्शविली परंतु जुनागढ, हैद्राबाद आणि जम्मू व काश्मिर या संस्थानांनी विलीनीकरणास विरोध केला. प्रसंगी कठोर निर्णय घेउन या सर्वांना एकत्रित आणून स्वतंत्र भारताची एकसंघ प्रतिमा तयार करण्याचे श्रेय लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांना जाते. या एकसंघतेमुळे भारत आज प्रगतीपथावर आहे असे प्रतिपादन डॉ. विलास इंगळे यांनी सरदार पटेलांच्या जयंती निमित्ते आयोजित कार्यक्रमात केले. यावेळी महाविद्यालयातील सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी प्रा. आर. एम. सूर्यवंशी, प्रा. डी. डी. पांढरे, प्रा. एस.डी. शिंदे, प्रा. एस. टी. दाडगे यांनी परिश्रम घेतले.

या कार्यक्रमाचे सूत्र संचालन डॉ. संजय अस्वले यांनी तर आभार रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. एम. एस. निर्मळे यांनी मानले. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे ५० (मुले) व ६० (मुली) असे एकूण ११० स्वयंसेवक उपस्थित होते. त्यांनी एकूण ११० मनुष्य तास ज्ञान / अनुभव घेतला.

## संविधान गौरव दिवस (२६ नोव्हेंबर २०१८)

जगातल्या सर्व देशांच्या संविधानाचा सखोल अभ्यास करून भारतासारख्या भाषिक वैविध्यता असेलल्या देशाचे संविधान तयार करून २६ नोव्हेंबर १९५० रोजी संविधान समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला अर्पण केले. भारतीय संविधानात ४४८ अनुच्छेद, १२ अनुसूचियां आणि ९४ संशोधन समाविष्ट आहेत. यामुळे जगातील सर्वात मोठे हस्तलिखित संविधानाचा मान भारतीय संविधानाला मिळतो ज्यामध्ये ४८ प्रकरणे आहेत जे लिहायला २ वर्ष, ११ महिने व १७ दिवसांचा कालावधी लागला. भारतीय संविधान तयार करणाऱ्या महामानवास या निमित्ताने स्मरण करणे प्रत्येकाचे प्रथम कर्तव्य आहे असे प्रतिपादन भारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री अमोल मोरे यांनी केले.

श्री छत्रपती शिवाजी महावद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना वा राज्यशास्त्र विभागाच्या वतीने संविधान दिवस साजरा करण्यात आला. डॉ. आंबेडकरांच्या प्रतिमेचे पूजन मा. अमोल मोरे, अध्यक्ष, भारत शिक्षण संस्था यांच्या शुभहस्ते करण्यात आले. याप्रसंगी उपस्थित सर्व प्राध्यापक व स्वयंसेवकांना लोकराज्य या मासिकाच्या प्रतींचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. घनश्याम जाधव, उपप्राचार्य डॉ. संजय अस्वले, विविध विभागांचे विभागप्रमुख, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. व्हीं. डी. देवरकर, शिक्षकेतर कर्मचारी व स्वयंसेवक उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. घनश्याम जाधव यांनी केले. सूत्रसंचालन उपप्राचार्य प्रा. डी. व्ही. थोरे यांनी तर आभार राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. एस. इ. बिराजदार यांनी मानले. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे ३० (मुले) व ३९ (मुली) असे एकूण ६९ स्वयंसेवक उपस्थित होते. त्यांनी एकूण ६९ मनुष्य तास ज्ञान / अनुभव घेतला.

# महात्मा फुले पुण्यतिथी (२८ नोव्हेंबर २०१८)

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने २८ नोव्हेंबरला महात्मा ज्योतिबा फुले यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. घनश्याम जाधव, उपप्राचार्य डॉ. संजय अस्वले, उपप्राचार्य व्ही. एस. इंगळे, उपप्राचार्य डी. व्ही. थोरे आदि मान्यवर उपस्थित होते. स्त्री शिक्षणाच्या पाया भरणीचे श्रेय महात्मा ज्यतीबा फुलेंना जाते.

अतिशय प्रतिकूल परिस्थिती मध्ये सावित्रीबाई यांना शिक्षणासाठी प्रेरित केले. तद्नंतर पहिली महिलासाठीची शाळा काढून स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली असे प्रतिपादन रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. विनोद देवरकर यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्र संचालन डॉ. संजय अस्वले यांनी तर आभार रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. एम. एस. निर्मळे यांनी मानले. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे ६० (मुले) व १५२ (मुली) असे एकूण २१२ स्वयंसेवक उपस्थित होते. त्यांनी एकूण २१२ मनुष्य तास ज्ञान / अनुभव घेतला.

# जागतिक एड्स दिन (१ डिसेंबर २०१८)

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, जिल्हा उपरुग्णालय, विधिज्ञ मंडळ, तात्याराजी मोरे कॉलेज ऑफ फार्मसी व रोटरी क्लब, उमरगा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जागतिक एड्स दिनानिमित्त संयुक्त रॅली दि. १ डिसेंबर रोजी काढण्यात आली. या रॅलीचा शुभारंभ येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयापासून करण्यात आला. यावेळी रॅलीचे उद्घाटन जिल्हा न्यायालयाचे वरिष्ठ न्यायाधीश एस बी साळुंके यांच्या शुभहस्ते संपन्न झाले.

जगभरामध्ये एड्स या रोगाने थैमान घातले आहे. त्याच्या पासुन बचाव, संरक्षण करण्यासाठी रॅलीच्या माध्यमातून तसेच राष्ट्रीय एड्स नियंत्रण संघटनेच्या सहयोगातून तयार झालेल्या 'मला खरे सांगा एच आय व्ही एड्स विषयी' या पत्रिकेच्या माध्यमातून समाजामध्ये जनजागृती करण्यात आली.

या रॅलीमध्ये श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाचे आजीवन शिक्षण व विस्तार विभाग, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, तात्यारावजी मोरे कॉलेज ऑफ फार्मसी, उमरगा चे विद्यार्थी, तसेच एन सी सी चे कडेटस सहभागी होते. विद्यार्थ्यांनी विविध घोषणांच्या, पोस्टरच्या माध्यमातून जनजागृती केली.

याप्रसंगी श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. घनश्याम जाधव, उपप्राचार्य डॉ. विलास इंगळे, उपप्राचार्य प्रा. धनाजी थोरे, उपप्राचार्य डॉ. संजय अस्वले यांच्या उपस्थिती सोबतच जिल्हा उपरुग्णालयाचे अधीक्षक डॉ. गणेश पुरी त्यांच्यासोबतच त्यांचे सर्व सहकारी, श्री एस बी साळुंके, जिल्हा न्यायाधीश, एन के कारंडे, दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, श्री यु पी कुलकर्णी, दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर दिवाणी, सौ. ए. एन नावंदर, न्यायाधीश वरिष्ठ स्तर, श्री आय एम नाईकवाडी, दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ, रोटे. संतराम मुरजानी, अध्यक्ष, रोटे. डॉ. अहंकारी, रोटे. युसुफ मुल्ला, रोटरी क्लब उमरगा हे उपस्थित होते.

या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. विनोद देवरकर, प्रा. राजेंद्र सूर्यवंशी, प्रा. एस डी शिंदे, प्रा. डी डी पांढरे, डॉ. एम एस निर्मळे, प्रा. दिघे, प्रा. कु. भावे, प्रा सौ. जाधव, श्री मंठालकर, महाविद्यालयीन शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहभाग नोंदवला. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे

९० (मुले) व १५० (मुली) असे एकूण २४० स्वयंसेवक उपस्थित होते. त्यांनी एकूण ६९० मनुष्य तास ज्ञान / अनुभव घेतला. Details on https://youtu.be/X-XIG73396Y

## जागतिक दिव्यांग दिवस (३ डिसेंबर २०१८)

जागतिक दिव्यांग दिनानिमित्त श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील आजीवन शिक्षण विभाग, मतदार साक्षर क्लब व राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दिव्यांग विद्यार्थी व स्टाफ यांचा "मी मतदार आहे याचा मला अभिमान आहे" या संदेशासह बँचेस देवून प्राचार्य डॉ जी एच जाधव, उपप्राचार्य डॉ संजय अस्वले यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. महाविद्यालय ग्रंथालय सेवक श्री औरादे, कु अर्चना कवलगे, कु मयुरी पवार, श्रुती शिरूरे या दिव्यांग विद्यार्थ्यांचे कौतुक केले. यावेळी डॉ केशव लेंगरे, डॉ अजित आष्टे, डॉ विनोद देवरकर, प्रा विजयकुमार मुळे यांची उपस्थिती होती. प्रा डॉ अस्वले यानी सुत्र संचलन तर प्रतिक्षा पाटील हिने प्रास्तविक केले. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे २५ (मुले) व ३५ (मुली) असे एकूण ६० स्वयंसेवक उपस्थित होते. त्यांनी एकूण ६० मनुष्य तास ज्ञान / अनुभव घेतला.

## जागतिक मानवाधिकार दिन (१० डिसेंबर २०१८)

निसर्गाने आपल्याला जगण्यासाठी आवश्यक त्या घटकांची निर्मिती केली. जगण्याचा हक्क दिला. पण आपण मात्र त्या हक्काचा गैरवापर करू लागलो. कौटुंबिक नाते टिकवणे आता गरजेचे झाले आहे. एकमेकांच्या हक्कांची पायमल्ली होऊ नये याची प्रत्येकाने काळजी घेतली पाहिजे असे मत डॉ. शुभदा पोतदार यांनी जागतिक मानवाधिकार दिनी व्यक्त केले.

याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी. एच. जाधव, उपप्राचार्य डॉ. व्ही. एस. इंगळे, उपप्राचार्य बी. एन. गायकवाड, पर्यवेक्षक व्ही. जी. तडोळगे, हिंदी विभागप्रमुख डॉ. आर. एम. खराडे, वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख व रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. विनोद देवरकर, डॉ. एम. एस. निर्मळे, प्रा. राजेंद्र सूर्यवंशी, प्रा. सुजित शिंदे, प्रा. डी. डी. पांढरे, सर्व विभागांचे विभागप्रमुख व प्राध्यापक उपस्थित होते.

यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे ६७ (मुले) व १३३ (मुली) असे एकूण २०० स्वयंसेवक उपस्थित होते. त्यांनी एकूण २०० मनुष्य तास ज्ञान / अनुभव घेतला.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामविस्तार दिन (१४ जानेवारी २०१९)

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात १४ जानेवारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या रौप्य महोत्सवी नामविस्तार दिन निमित्ते राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने साजरा करण्यात आला. यावेळी डॉ. अनाद जाधव यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. घनश्याम जाधव, उपप्राचार्य डॉ. संजय अस्वले, उपप्राचार्य व्ही. एस. इंगळे, उपप्राचार्य डी. व्ही. थोरे हे उपस्थित होते. नामविस्तार दिनाच्या निमित्ताने बोलतांना डॉ. आनंद जाधव म्हणाले कि विद्यार्थ्यांना प्रश्न निर्माण करणारे शिक्षण दिले गेले पाहिजे.

प्रथमतः डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेचे पूजन करून या कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी एच जाधव, उपप्राचार्य डॉ. व्ही. एस. इंगळे, उपप्राचार्य डॉ. एस एन अस्वले, उपप्राचार्य डी व्ही थोरे, प्रा. एस डी. गावित, सर्व विभागांचे विभागप्रमुख, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी भूगोल दिनानिमित्ते वसुंधरेचे पूजनही करण्यात आले. या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी प्रा. आर. एम. सूर्यवंशी, प्रा. डी. डी. पांढरे, प्रा. एस.डी. शिंदे, प्रा. एस. टी. दाडगे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. संजय अस्वले यांनी केले तर कार्यक्रमाधिकारी डॉ. विनोद देवरकर यांनी आभार मानले.

यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे ७० (मुले) व ११० (मुली) असे एकूण १८० स्वयंसेवक उपस्थित होते. त्यांनी एकूण १८० मनुष्य तास ज्ञान / अनुभव घेतला.

## युवा सप्ताह (१२ ते १९ जानेवारी २०१९)

युवक हा राष्ट्राच कणा असतो. त्याच्यातील उर्जेला विधायक राष्ट्रहित जोपासणाऱ्या कार्याची जोड दिली तर मोठी मोठी कामे होऊ शकतात. म्हणून या कालावधी दरम्यान स्वामी विवेकानंद व राष्ट्रमाता जिजाऊ, एक आदर्श पुत्र तर दुसरी आदर्श माता .. यांच्या विचारांचे अमृत स्वयंसेवकांपर्यंत पोहचवण्याचे काम या दरम्यान व्याख्यानाच्या माध्यमातून करण्यात आले. शाळा व शिबिरातून ज्ञान व श्रम याचे महत्व सांगण्यात आले.

स्वयंसेवक म्हणून समाजात काम करत असतानाच सामाजिक प्रश्नांची जाण त्याला होतेच पण ते कार्य करत असताना प्रश्नांचे उत्तर शोधण्याची संधी ही त्याला मिळत असते. प्रश्नांची उकल असताना उत्तरही त्यांना मिळत आणि यामधूनच त्याची संशोधन वृत्ती वृद्धिंगत होते. देशाचे भवितव्य हे अशाच सळसळत्या रक्ताच्या तरुणांवर अवलंबून असते जे देशासाठी बौद्धिक सामाजिक आणि आर्थिक पातळीवर योगदान देणाऱ्या तरुणांची पिढी घडवण्याचे कार्य राष्ट्रीय सेवा योजनेच्या विविध उपक्रमांच्या माध्यमातून शाळा, महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग करत असतात.

राष्ट्रीय सेवा योजनेची शिबिरे युवकांसाठी संस्कार शिबिरे असतात या शिबिराच्या माध्यमातून त्यांना श्रमसंस्कार शिकवले जातात. कोणतेही काम कमी किंवा उच्च प्रतीचे नसते याची प्रयत्नपूर्वक जाणीव करून देण्यासाठी या शिबिरांचे आयोजन केलेले असते. विद्यार्थी हा उद्याचा नागरिक असतो. समाजातील प्रत्येक प्रश्नांबाबत संवेदनशील असलेला नागरिकच देशाचे उज्ज्वल भवितव्य घडवू शकतो.

या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. विनोद देवरकर, प्रा. राजेंद्र सूर्यवंशी, प्रा. एस डी शिंदे, प्रा. डी डी पांढरे, डॉ. एम एस निर्मळे, प्रा. दिघे, प्रा. कु. भावे, प्रा सौ. जाधव, श्री मंठालकर, महाविद्यालयीन शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहभाग नोंदवला.

यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे ४० (मुले) व ८० (मुली) असे एकूण १२० स्वयंसेवक उपस्थित होते. त्यांनी एकूण १२० मनुष्य तास ज्ञान / अनुभव घेतला.

# राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी कार्यशाळा (२३ ते २४ फेब्रुवारी २०१९)

राष्ट्रीय सेवा योजना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने " सक्षम युवा, समर्थ भारत" या अभियानासाठी दिनांक २३ व २४ फेब्रुवारी २०१९ रोजी महाराष्ट्रातील सर्व +२ शाळा , कृषी विद्यापीठे, अकृषी विद्यापीठे, तंत्रनिकेतने इत्यादि च्या अंतर्गत येत असलेल्या सर्व शाळा व महविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रमाधीकार्यांसाठी राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन क्रीडा संकुल, बालेवाडी, पुणे येथे केल्या गेले. या कार्यशाळेसाठी कार्यक्रमाधिकारी डॉ. विनोद देवरकर उपस्थित होते.

या कार्यशाळेमध्ये राज्यभरातून जवळपास २१०० कार्याक्रमाधीकार्यांनी सहभाग नोंदवला. राष्ट्रीय सेवा योजनेने आता सुवर्ण महोत्सवी वर्षात पदार्पण केले. मागील ५० वर्षात या योजनेने काय कमावले व भविष्यामध्ये काय करावे ? याचे नियोजन करण्यासाठीची ही कार्यशाळा होती. येत्या २०४५ पर्यन भारत हा तरुणांचा देश असणार आहे जेथे साधारणतः ६८% लोकसंख्या ३० वर्षापेक्षा कमी वयाची असेल. अश्या तरुणांची उर्जा देशाच्या, समाजाच्या उन्नतीसाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून कशी वापरता येईल यावर महारष्ट्र राज्याचे शिक्षण मंत्री मा. विनोदजी तावडे यांनी आपले विचार मांडले. डॉ. अतुल साळुंके, राज्यसंपर्क अधिकारी रासेयो व डॉ. प्रभाकर देसाई, संचालक रासेयो सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांनी उत्तमोत्तम वक्ते, विचारवंताची मांदियाळी येथे केली होती.

राष्ट्रीय सेवा योजनेचे एकंदरीत कार्यप्रणाली, ध्येय व उद्दिष्टे कळण्यास नवख्या कार्याक्रमाधीकार्यांना मदत झाली. या कार्यशाळेतून बरेच काही शिकायला मिळाले. अनेकांच्या ओळखी झाल्या. ज्याचा फायदा पुढे राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्य करत असतांना निश्चितच होणार आहे.

***

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडून दिलेल्या वार्षिक आराखड्यानुसार तसेच प्रासंगिक/तत्काळ सूचनेनुसार २०१८-१९ या वर्षामध्ये सुनियोजित पद्धतीने उपक्रम राबण्यात आलेत.

**कार्यक्रमाधिकारी**

१) डॉ. विनोद देवरकर .................

२) प्रा. राजेंद्र सूर्यवंशी .................

३) डॉ. मनोरंजना निर्मळे .................

**प्राचार्य**

# वनमहोत्सव (१ ते ७ जुलै २०१८)




महाविद्यालयात वृक्षारोपण करून वनमहोत्सव साजरा केला गेला




शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वृक्षारोपण करतांना




महाविद्यालयात रासेयो स्वयंसेवकांनी वृक्षारोपण करून वनमहोत्सव साजरा केला

# हरित सेना व रेड रिबन क्लब तर्फे वृक्षारोपण (२० जुलै २०१८)




भारत शिक्षण संस्थेचे पदाधिकारी व कार्यक्रमाधिकारी वृक्षारोपण करतांना




वृक्ष संवर्धनासाठी दत्तक योजनेंतर्गत ट्री गार्ड लावतांना माजी विद्यार्थी



# आपत्ती पूर्व प्रशिक्षण कार्यशाळा (११ ऑगस्ट २०१८)

आपत्ती पूर्व प्रशिक्षण देतांना नगर परिषद, उमरगा चे पदाधिकारी

# अण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक पुण्यतिथी (१ ऑगस्ट २०१८)





महाविद्यालयात अण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळकांच्या प्रतिमेचे पंजान करतांना मान्यवर





जयंती व पुण्यतिथी का साजऱ्या कराव्या हे व्याख्यानातून सांगतांना डॉ. डी. बी. ढोबळे





डॉ. एस. एन. अस्वले मार्गदर्शन व डॉ. निर्मळे आभार व्यक्त करतांना

# आंतरराष्ट्रीय आदीवासी दिवस व राष्ट्रीय जंत नाशक दिन (१० ऑगस्ट २०१८)





राष्ट्रीय जंत नाशक दिन व आंतरराष्ट्रीय आदीवासी दिवस साजरा करतांना कार्यक्रमाधिकारी

# स्वच्छता पंधरवडा दिनांक (१ ते १५ ऑगस्ट २०१८)





स्वच्छता शपथ महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांनी ग्रहण केली

# स्वच्छता पंधरवडा दिनांक (१ ते १५ ऑगस्ट २०१८)




रासेयो स्वयंसेवक परिसर स्वच्छता करतांना




राष्ट्रीय सेवा योजना, रेड रिबन क्लब व हरित सेनेच्या माध्यमातून परिसर स्वच्छता शिबिर यांच्या वतीने परिसरात दिनांक २ ते ५ ऑगस्ट दरम्यान सम्पन्न झाले.




स्वयंसेवकांनी पदयात्रा काढून गावकर्यांना स्वच्छतेचा संदेश पत्रकांच्या माध्यमातून दिला

# विद्यापीठ वर्धापन दिन (२३ ऑगस्ट २०१८)







विद्यापीठ वर्धापन दिनी ध्वजारोहण करतांना प्राचार्य डॉ. जी. एच. जाधव



कार्यक्रमाधिकारी प्रस्तावना करतांना



डॉ. रमेश दापके मार्गदर्शन करतांना

# कौशल्य विकास कार्यशाळा (२३ ऑगस्ट २०१८)






रोटरी क्लब चे अध्यक्ष संत्रं मुरजानी व सचिव डॉ. मेनकुदळे कौशल्य विकास कार्यशाळेत मार्गदर्शन करतांना

# वृक्ष रक्षाबंधन (२७/०८/२०१८)







वृक्ष रक्षाबंधन या अभिनव उपक्रमांतर्गत प्राचार्य, उपप्राचार्य, कार्यक्रमाधिकारी व स्वयंसेवक विद्यार्थी झाडांना राखी बांधतांना

# केरळ पूरग्रस्तांसाठी मदत फेरी (३० ऑगस्ट २०१८)





राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक केरळ अपदाग्रस्तांसाठी मदत फेरी काढली












बाजारपेठेतून मदत फेरी च्या माध्यमातून निधी जमा करतांना

# स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण -२०१८








**स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण -१८ या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना गावात असलेल्या सुविधा चा आढावा ऐप च्या माध्यमातून नोंदविण्याचे शिकविण्यात आले.**

# शिक्षक दिन व स्वयंशासन दिन (५ सप्टेंबर २०१८)





**स्वयंशासन दिन व शिक्षक दिनानिमित्ते रासेयो स्वयंसेवकांनी शिक्षकांचे कविसंमेलन आयोजित केले. कविसंमेलनात शिक्षकांनी रंग भरला.**







**उमरगा येथील छत्रपती शिवाजी महाविद्यालयात विद्यार्थ्यांनी आयोजित केले प्राध्यापकांचे काव्य संम्मेलन.**

https://youtu.be/9-ckFF5o_5c

# रोटरी युथ लीडरशिप अवार्ड (रायला, १२ सप्टेंबर २०१८)











रायला उपक्रमातून स्वयंसेवकांना जीवनात यशस्वी होण्याचा मंत्र देतांना रोटे. डॉ. संजय अस्वले

# धम्मचक्र प्रवर्तन दिन (१४ ऑक्टोबर २०१८)





# रासेयो वर्धापन दिन साजरा (२४ सप्टेंबर २०१८)







रासेयो वर्धापन दिनी दध्वजारोहण प्रसंगी उपस्थित स्वयंसेवक व प्राध्यापक





ध्वजारोहण व स्वच्छ हि सेवा यावर मार्गदर्शन करतांना प्राचार्य जी एच जाधव

# सर्जिकल स्ट्राईक दिवस/ शौर्य दिवस (२९ सप्टेंबर २०१८ )




सर्जिकल स्ट्राईक दिवस - कॅप्टन सुर्यकांत जाधव मार्गदर्शन करतांना




सर्जिकल स्ट्राईक दिवस प्राचार्य डॉ. जाधव मार्गदर्शन करतांना

# दिनांक ०२ ऑक्टोंबर २०१८ (महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती)



राष्ट्रपिता महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली.

# दिनांक ०२ ऑक्टोंबर २०१८ (महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती)





**स्वच्छता रैली : स्वयंसेवकांनी व कार्यक्रमाधीकारी यांनी परीसरात स्वच्छता ठेवण्याचे महत्व छापील पत्रिकांच्या माध्यमातून समजावून सांगण्यासाठी घरोघरी भेटी दिल्या.**







**श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना, रेड रिबन क्लब व हरित सेनेच्या माध्यमातून परिसर स्वच्छता, वृक्ष संवर्धन व प्लास्टिक मुक्त परिसर यावर कार्यशाळा**

# जागतिक अंध दिन व वाचन प्रेरणा दिन (दि. १५ ऑक्टोबर२०१८)





**जागतिक अंध दिन व वाचन प्रेरणा दिन डॉ. ए.पी.जे. कलम यांच्या प्रतिमेचे पूजन करून जीवनात वाचनाचे महत्व या विषयावर व्याख्यान आयोजित केले.**

# राष्ट्रीय एकता दिवस (दि. ३१ ऑक्टोबर २०१८)






**सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंती निमित्ते "राष्ट्रीय एकता दिवस"साजरा करण्यात आला**

# संविधान गौरव दिन (२६ नोव्हेंबर २०१८)





**संविधानकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेचे पूजन करून संविधान गौरव दिन साजरा केला**

# जागतिक एड्स दिन (१ डिसेंबर २०१८)





**महाविद्यालय, जिल्हा उपरुग्णालय, विधिज्ञ मंडळ, तात्याराजी मोरे कॉलेज ऑफ फार्मसी व रोटरी क्लब, उमरगा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जागतिक एड्स दिनानिमित्त संयुक्त रॅली दि. १ डिसेंबर रोजी काढण्यात आली.**





# जागतिक दिव्यांग दिन (३ डिसेंबर २०१८)






आजीवन शिक्षण विभाग, मतदार साक्षर क्लब व राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दिव्यांग विद्यार्थी व स्टाफ यांचा "मी मतदार आहे याचा मला अभिमान आहे" संदेशासह सत्कार करण्यात आला

# महिला सबलीकरण सप्ताह (३ ते १० जानेवारी २०१९)





महिलांसाठी हिमोग्लोबिन तपासणी शिबीर

# युवा सप्ताहानिमित रक्त घटक तपासणी शिबीर (१२ ते १९ जानेवारी २०१९)




स्वयंसेवक, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचार्यांसाठी हिमोग्लोबिन तपासणी शिबीर




युवासप्तहनिमित्ते व्याख्यान देतांना कार्यक्रमाधिकारी डॉ. विनोद देवरकर

# लोकशाही पंधरवडा (दिनांक १८ जानेवारी ते १० फेब्रुवारी २०१९)




लोकशाही जपण्याची शपथ घेतांना प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी




**महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी वर्ग खोल्या, गार्डन मध्ये जाऊन मतदार जनजागृती करत असतांना**





**स्वयंसेवकांनी राष्ट्रीय मतदार दिनानिमित्ते जनजागृती शोभायात्रा काढली त्याची क्षणचित्रे**




**मतदार दिनानिमित्ते शपथ घेतांना महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी**

**कार्यक्रमाधिकारी** **प्राचार्य**